डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
कृषि नगर, अकोला ४४४ ००१

वाचा : १. कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक : जपुती २०२५/प्र.क्र.१९५/कार्या-जपुक.२९, दिनांक २९ डिसेंबर, २०२५.

परिपत्रक:-

जा.क्र साप्रवि /परिपत्रक/संविधान /२०२६ /3261 दि २५/११/२०२६

संदर्भीय शासन परिपत्रकान्वये सन २०२६ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम मंत्रालयात व सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात साजरे करणेबाबत शासनाचे परिपत्रक निर्गमित आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी / कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्गमित परिशिष्ट मध्ये नमूद केल्यानुसार भारतीय संविधान दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक कार्यालयामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याकरिता दिनांक २६/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता कार्यालयीन स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करावे. परिपत्रकासोबत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची प्रत जोडलेली आहे.

प्रिती रोडगे,
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी माहीती व उचित कार्यावहीकरीता.

१. संचालक शिक्षण /संशोधन/विस्तार शिक्षण डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
२. अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व)----------
४. विभाग प्रमुख (सर्व)---------- डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
५. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन केंद्रे (सर्व) ----------
६. वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्र (सर्व)----------
७. नियंत्रक,/विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी पं.दे.कृ. वि., अकोला.
८. मा. कुलगुरुंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहीतीकरीता.
९. उपकुलसचिव आस्थापना / सामान्य प्रशासन विभाग / वि.वि. डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला
१०. प्रभारी अधिकारी, (ARIS Cell) यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याकरीता



भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.